२) ग्रुप **'B'** या मधून कमीत कमी एक विषय आवश्यक आहे. तथापि या गटातून जास्तीत जास्त दोन विषय निवडता येतील. ज्यांना पुढे इंग्रजी स्पेशल विषय घ्यावयाचा आहे त्यांनी इंग्रजी वैकल्पीक हा विषय घेणे आवश्यक आहे.

ग्रुप **'B'**

१) वाङ्मयीन मराठी / उपयोजित मराठी

२) हिंदी

३) इंग्रजी वैकल्पीक

३) खालील ग्रुप मधून कमीत कमी ३ व जास्तीत जास्त ४ वैकल्पीक विषय घेता येतील.

| | | |
|---|---|---|
| ग्रुप 'C' | : | अर्थशास्त्र अथवा राज्यशास्त्र |
| ग्रुप 'D' | : | इतिहास |
| ग्रुप 'E' | : | भूगोल |
| ग्रुप 'F' | : | मानसशास्त्र अथवा संरक्षण शास्त्र |

एफ्.वाय. ला घेतलेल्या विषयांमधून एस्. वाय./ टी. वाय. ला विषय घ्यावे लागतील. विषय बदल करता येणार नाहीत.

४) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या आदेशान्वये (पत्र क्र.उमवी/ १२/१७६/२००९ दि. २३/५/२००९) शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून

सत्रपद्धती लागु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर सत्र पद्धतीनुसार प्रत्येक विषयासाठी ४० गुणांची अंतर्गत परीक्षा व ६० गुणांची बहि:स्थ परीक्षा होईल.

५) प्रथम वर्षासाठी पर्यावरण शास्त्र हा विषय अनिवार्य आहे.

६) प्रथम व द्वितीय वर्षासाठी सामान्य ज्ञान (G.K.) हा विषय अनिवार्य (Compulsory) आहे. या विषयाची परीक्षा एस.वाय. बी. ए. ला होईल. टी. वाय.बी. ए.पर्यन्त सामान्य ज्ञान परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### एस्.वाय.बी.ए. (स्पेशल) विशेष स्तर

१) सक्तीचे इंग्रजी

२) खालील पैकी कोणताही एक, एफ्.वाय.बी.ए. ला निवडलेल्या वैकल्पीक

**स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेचे**

# दादासाहेब रावल महाविद्यालय

## मांडळ रोड, दोंडाईचा, जि. धुळे

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये स्वातंत्र्यपूर्व काळात शिक्षणाद्वारे स्वावलंबन निर्माण करुन, राष्ट्रहित व समाजहित साधण्याचा उदात्त दृष्टीकोन केंद्रीत करुन, स्वोद्धारक विद्यार्थी संस्थेची स्थापना १९२७ मध्ये करण्यात आली. विद्यार्थ्यांना अनेकविध शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा हे ध्येय बाळगुन मा. शिक्षणमहर्षी दादासाहेब रावल यांनी १९५२ पासून संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळून संस्थेची झपाट्याने संख्यात्मक व गुणात्मक वाढ केली. विद्यार्थ्यांना अद्ययावत उच्च शिक्षण मिळावे या दृष्टीकोनातून, संस्थेने १९८४ मध्ये शिंदखेडा तालुक्यातील पहिले विज्ञान महाविद्यालय व १९९१ मध्ये कला शाखेला सुरुवात केली. अल्पकालावधीत महाविद्यालयाने नॅक मुल्यांकनात 'अ' श्रेणी प्राप्त केली. महाविद्यालयात विविध शैक्षणिक उपक्रमांबरोबरच, विविध सांस्कृतीक कार्यक्रम व विविध खेळ स्पर्धांचे आयोजन करुन, विद्यार्थ्यांना आपले कलागुण व क्रीडा नैपुण्य दाखविण्याची संधी उपलब्ध केली जाते. महाविद्यालयात राष्ट्रमहापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजऱ्या करुन व महाविद्यालयातील एन.सी.सी., एन.एस.एस. विद्यार्थी कल्याण विभाग, Gymkhana विभाग व युवतीसभा शाखेमार्फत विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक व राष्ट्रीय बांधीलकी निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. महाविद्यालयाची सुसज्ज इमारत, समृद्ध ग्रंथालय, अद्ययावत संगणक कक्ष, विविध शैक्षणिक सोयी सुविधा, निसर्गरम्य परिसर, विस्तृत क्रिडांगण, तज्ञ व संशोधक प्राध्यापकवृंद, कुशल व्यवस्थापन, गुणवत्तेचे सातत्यपूर्ण व काटेकोर अध्ययन-अध्यापन कार्य इ. महत्वाचे पैलु आहेत.

## महाविद्यालयातील शाखा निहाय अभ्यासक्रम

महाविद्यालयात कला शाखेत पदवी पर्यन्त व विज्ञान शाखेत पदवी व पदव्युत्तर शिक्षणाची सोय आहे.

### कला विद्या शाखा

**प्रथमवर्ष (एफ्.वाय.बी.ए.)**

विद्यापीठाने ठरवून दिलेल्या ग्रुपप्रमाणेच विद्यार्थ्यांना सहा विषय घेणे आवश्यक आहे.

१) ग्रुप **'A'** सक्तीचे इंग्रजी.

विषयांपैकी एक स्पेशल विषय मराठी, इंग्रजी, हिंदी, इतिहास, भूगोल.

३) खालील पैकी विषयांमधुन वैकल्पीक विषयासाठी निवड करता येईल.

| | |
|---|---|
| १) वाङ्मयीन मराठी/उपयोजित मराठी | २) हिंदी |
| ३) अर्थशास्त्र / राज्य शास्त्र | ४) इतिहास |
| ५) संरक्षण शास्त्र / मानस शास्त्र | ६) भुगोल |

## अभ्यासक्रमाची सामान्य रचना

| एस्.वाय.बी.ए. | टी.वाय.बी.ए. |
|---|---|
| १) सक्तीचे इंग्रजी | १) सक्तीचे इंग्रजी |
| २) जनरल | २) जनरल |
| ३) जनरल | ३) जनरल |
| ४) जनरल | ४) जनरल |
| ५) एस्-१ | ५) एस्-३ |
| ६) एस्-२ | ५) एस्-४ |

१) प्रथमवर्ष कला वर्गाच्या अंतर्गत परीक्षेत कमाल २ विषयात अनुत्तीर्ण व बहिस्थपरिक्षेत कमाल २ विषयात अनुत्तीर्ण असणारे विद्यार्थी द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

२) तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय वर्षाच्या अंतर्गत परिक्षेत कमाल दोन विषय व बहिस्थ परिक्षेत कमाल दोन विषय अनुत्तीर्ण असणारे विद्यार्थी तृतीय वर्षाच्या प्रवेशास पात्र राहतील.

## ❊ विज्ञान विद्याशाखा ❊

**प्रथमवर्ष** (एफ्.वाय.बीएस्सी.)

खालील पैकी कोणताही एक ग्रुप घेता यईल.

1) C P M E
2) C B Z G
3) C B Z P
4) COM, P M E

C : Chemistry
P : Physics
E : Electronics
M : Mathematics
B : Botany
Z : Zoology
G : Geography
COM : Computer Sci.

१) **संगणकशास्त्र** (Computer Science) हा विषय विना अनुदानीत तत्वावर आहे.



२) प्रथम वर्ष संगणकशास्त्र हा विषय निवडावयाचा असल्यास १२ वी ला गणित हा विषय घेऊन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) संगणक शास्त्र या विषयासाठी प्रवेश गुणवत्तेनुसार दिला जातो.

४) संगणक शास्त्र या विषयासाठी प्रवेश फी विद्यापीठ नियमानुसार द्यावी लागेल.

५) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांच्या आदेशान्वये (पत्र क्र.उमवी/१२/१७६/२००९ दि. २३/५/२००९) शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून सत्रपद्धती लागु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर सत्र पद्धती नुसार प्रत्येक विषयासाठी ४० गुणांची अंतर्गत परिक्षा व ६० गुणांची बहि:स्थ परीक्षा होईल.

६) प्रथम वर्षासाठी पर्यावरण शास्त्र हा विषय अनिवार्य आहे.

७) प्रथम व द्वितीय वर्षासाठी सामान्य ज्ञान (G.K.) हा विषय अनिवार्य (Compulsory) आहे. या विषयाची परीक्षा एस.वाय. बी. एस्सी. ला होईल. टी. वाय. बी. एस्सी. पर्यन्त सामान्य ज्ञान परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

**द्वितीय वर्ष** (एस्.वाय.बी.एस्सी.)

१) प्रथम वर्षी घेतलेल्या चार विषयांपैकी विद्यार्थ्याला कोणतेही तीन विषय घेता येतील, तसेच मराठी अथवा इंग्रजी यापैकी एक विषय घेणे सक्तीचे आहे.

२) द्वितीय वर्ष विज्ञान या वर्गासाठी सत्र पद्धती लागू करण्यात आली आहे. सदर सत्र पद्धती नुसार प्रत्येक विषयासाठी ४० गुणांची अंतर्गत परिक्षा व ६० गुणांची बहिस्थ परीक्षा होईल.

३) प्रथमवर्ष विज्ञान वर्गाच्या लेखी परीक्षेत कमाल ५ विषयात अनुत्तीर्ण व बहिस्थ परिक्षेत कमाल १ विषय अनुत्तीर्ण असणारे विद्यार्थी द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

**तृतीय वर्ष** (टी.वाय.बी.एस्सी.)

१) द्वितीय वर्षी घेतलेल्या विषयांपैकी कोणताही एक विषय (विशेष) घेता येईल.

२) तृतीय वर्ष विज्ञान या वर्गासाठी सत्र पद्धती लागू करण्यात आली आहे. सदर सत्र पद्धती नुसार प्रत्येक विषयासाठी ४० गुणांची अंतर्गत परिक्षा व ६० गुणांची बहिस्थ परीक्षा होईल.

३) तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी प्रथम वर्षाची परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच द्वितीय वर्षाच्या लेखी परीक्षेत कमाल ४ विषयात अनुत्तीर्ण व प्रत्यक्ष

आत आपले प्रवेश अर्ज महाविद्यालयात दाखल करुन संपूर्ण फी भरुन प्रवेश घेणे आवश्यक आहे.

एस्.वाय. प्रवेशासाठी एफ्.वाय. च्या तर टी.वाय. प्रवेशा साठी एफ्.वाय. व एस्.वाय.च्या गुणपत्रकांची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.

## सर्वसाधारण नियम

१) प्रवेश अर्ज संपूर्णपणे व बिनचूक भरला पाहिजे.

२) महत्वाच्या कागदपत्रांच्या जादा झेरॉक्स सत्यप्रती आपल्याजवळही काढून ठेवाव्यात. महाविद्यालयात एकदा जमा केलेले कागदपत्र अशा झेरॉक्सप्रती करण्यासाठी कार्यालयातून मिळणार नाही.

३) विद्यार्थ्याने प्रवेश अर्ज स्वत: भरला पाहिजे व फी भरुन प्रवेश निश्चित करावा.

४) फी सवलत / स्कॉलरशिप इ. साठीचे अर्ज प्रवेश अर्जासोबत कार्यालयात जमा केले पाहिजे. तसे न केल्यास त्याबाबतची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील, सवलत नामंजूर झाल्यास फी भरावी लागेल.

५) महाविद्यालयात प्रवेश देणे हे गुणवत्ता, वर्तणूक इ. बाबींवर अवलंबून राहील. प्रवेश देण्याचा अथवा नाकारण्याचा अंतिम अधिकार प्राचार्यांचा राहील.

६) विद्यापीठ अध्यादेश क्रमांक ११६ प्रमाणे कोणत्याही विद्यार्थ्यास एकाच वर्षात एकाच वेळी दोन पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही.

७) उ.म.वि. परिपत्रक क्र. ७८/१९९४ नुसार विद्यार्थ्याने *प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसानंतर प्रवेश रद्द केल्यास त्यास कुठलेही शुल्क परत मिळणार नाही.*

८) स्थलांतर दाखल्यासाठी (Migration Certificate) वेळ लागत असल्याने लवकर अर्ज करावा.

९) **विद्यापीठ पात्रता प्रमाण पत्र** (Eligibility Certificate) प्रथम वर्ष बी.ए./ बी.एस्सी. या वर्गात प्रवेश निश्चित होण्यासाठी विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांचा पात्रता अर्ज (Eligibility Certificate) व परीक्षेचे मुळ गुणपत्रक महाविद्यालय विद्यापीठाकडे पाठविते त्यानंतर विद्यापीठाकडून प्रवेशाबद्दल मान्यता देण्यात येते. विद्यापीठाकडून अशी मान्यता न मिळाल्यास प्रवेश रद्द केला जाईल व त्याची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. यासंबंधी अधिक माहिती कार्यालयातून घ्यावी.



परिक्षेत १ विषयात अनुत्तीर्ण असणारे विद्यार्थी द्वितीय वर्षास प्रवेश घेण्यास पात्र राहतील.

**एम. एस्सी.** (ऑर्गेनिक केमेस्ट्री) भाग १ व भाग २

१) एम. एस्सी. भाग १ साठी १० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता विद्यापिठाने निश्चित केली आहे.

२) प्रवेश प्रक्रीया विद्यापिठाद्वारे केंद्रीय पद्धतीने केली जाईल.

३) वरील अभ्यासक्रम विनाअनुदानीत असल्यामुळे विद्यापिठाच्या नियमानुसार फी घेतली जाईल.

## * प्रवेश प्रक्रिया *

१२ वी परिक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साधारण २० दिवसांच्या आंत विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी या माहिती पुस्तीके सोबत दिलेला प्रवेश नमुन्यातील अर्ज पूर्णपणे भरुन महाविद्यालयात दाखल करणे आवश्यक आहे.

## प्रवेश अर्जासोबत

अ) मूळ लिव्हींग सर्टिफिकेट व त्यांच्या दोन झेरॉक्स सत्यप्रती.

ब) १० वी मार्कशीट व पासींग सर्टिफिकेटच्या दोन सत्य प्रती.

क) १२ वी/डी.एड्./अभियांत्रीकी पदविका मूळ गुणपत्रक व त्याच्या दोन झेरॉक्स सत्यप्रती, दोन पासपोर्ट साईजचे फोटो, पासींग सर्टिफिकेट/ बोनाफाईड सर्टिफिकेट/ वर्तवणूक दाखला.

ड) पूर्णपणे भरलेला विद्यापीठ पात्रता अर्ज.

इ) मतदार नांव नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे

- * पासपोर्ट साईज फोटो
- * लिव्हींग सर्टीफिकेट सत्यप्रत
- * आधार कार्डची सत्यप्र
- * रेशन कार्डची सत्यप्रत
- * फॉर्म नं. ६
- * नांव मतदार यादीत नोंदविले असेल तर ईलेक्शन कार्डची सत्यप्रत

ई) जे विद्यार्थी महाराष्ट्र राज्याबाहेरील आहेत. त्यांनी पात्रता अर्जासोबत रु. १२०/– फक्त भरुन व वरील कागदपत्र जोडून महाविद्यालयाच्या कार्यालयात सादर करावा.

द्वितीय व तृतीय वर्ष बी.ए./बी.एस्सी. वर्गात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्या आधीच्या वर्गाच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर १० दिवसांची

टिप :- शासन परिपत्रकाप्रमाणे वरील फी मर्यादेत तफावत असू शकते, तसे विद्यार्थ्यांना कळविण्यात येईल.

## ❊ शिष्यवृत्ती व आर्थिक सवलती ❊

## शासनातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती

१) आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील विद्यार्थ्यांना सवलती व गुणवत्ता शिष्यवृत्ती.

*२) राज्य सरकारी नोकरांच्या पाल्यांना मिळणारी फी सवलत.*

३) प्राथमिक शिक्षकांच्या मुला-मुलींसाठी फी सवलत.

४) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुला-मुलींना शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती.

५) अपंग विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत व शिष्यवृत्ती.

६) माजी व आजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलत.

७) मागासवर्गीय विद्यार्थ्यास भारत सरकारची शिष्यवृत्ती.

८) राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (N.O.M.S.)

९) राज्यसरकारची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती (शालांत व उच्च माध्यमिक परीक्षेनंतर)

१०) प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणाऱ्या राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती (S.G.O.M.S.)

११) *ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना मिळणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती.* (S.S.C./H.S.C.) *नंतर*

१२) महाराष्ट्र शासनातर्फे विविध विशेष गुणवत्ताधारी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती.

१३) 'कमवा व शिका' या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल, गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे या योजनेखाली विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त ३ तास काम अध्ययनाच्या वेळे व्यतिरिक्त करावे लागेल. प्रति तास मेहनताना रु. ६/- राहील. ही योजना विद्यापीठ चालविते म्हणून विद्यार्थ्यांच्या वेळोवेळी बदलणाऱ्या विषयानुसार योजनेचा लाभ घेता येईल.

१४) *एकलव्य विद्याधन योजना* - या योजने अंतर्गत जळगांव जनता सहकारी बँक लि. जळगांव आणि बँक ऑफ महाराष्ट्र जळगांव यांच्या शाखांद्वारे शिक्षणासाठी एकुण खर्चाच्या ७०% रक्कम कर्ज स्वरुपात द.सा.द.शे. ११% दराने उपलब्ध करुन देण्यात येते.



१०) **शाळा सोडल्याचा दाखला** (School Leaving Certificate)
एच्.एस्.सी. (१२ वी) किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना हा शाळा सोडल्याचा दाखला प्रवेश अर्जासोबत दाखल करावा लागतो.

११) **महाविद्यालय सोडल्याचा दाखला** (Transference Certificate)
विद्यार्थ्याने महाविद्यालयातील शिक्षण सोडल्यावर त्याने मागणी केल्यानुसार त्यास महाविद्यालय सोडल्याचा दाखला दिला जातो. त्यासंदर्भात अर्ज करुन सोबत मार्कशीटची सत्यप्रत जोडावी व कार्यालयात दाखल केल्यानंतर साधारणपणे तीन दिवसात टी.सी. मिळेल.

१२) **स्थलांतराचा दाखला** (Migration Certificate)
एका विद्यापीठातील महाविद्यालयातून दुसऱ्या विद्यापीठातील महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांस हा दाखला सादर करावा लागतो.

१३) महाविद्यालय सोडल्यावर द्वितीय/तृतीय वर्ष प्रवेश साठी पात्रता दाखला जोडावा.

१४) महाविद्यालय बदलुन ह्या महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याने त्या महाविद्यालयाकडून शिष्यवृत्ती दाखला सोबत आणावा.

### फी भरणा संबंधी-

विद्यार्थ्याने फीचा भरणा हा महाविद्यालयातील कॅशिअरकडेच करावा व त्याची पावती घ्यावी.

## ❊ शिष्यवृत्ती साठी शर्ती व अटी ❊

१) शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वडील नोकरीत असतील त्याने शेती उत्पन्नाचा दाखला फॉर्ममध्ये जोडू नये.

*२)* संबंधित कार्यालयातून शिष्यवृत्ती मंजूर झाली म्हणजे नोटीस बोर्डावर सूचना लावण्यात येईल. त्या विषयी वारंवार विचारणा करु नये.

३) अपूर्ण व खाडाखोड झालेले दाखले असल्यास शिष्यवृत्ती मंजूर होणार नाही.

४) S.C. व S.T. विद्यार्थ्यांचे उत्पन्नाची मर्यादा ६ लाखाच्या (सहा लाख ) आत असली पाहिजे.

५) O.B.C., S.B.C. व N.T. शिष्यवृत्ती मर्यादा ४.५ लाख पर्यन्त असली पाहिजे.

६) शिष्यवृत्ती धनादेश तयार झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत घेऊन जाणे. उशीर झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

७) E.B.C. मर्यादा जास्ती जास्त एक लाख पर्यन्त आहे.

प्रा. बी. डी. शिंपी यांचे तर्फे गणित विभागातून सर्वप्रथम

१०) कै. बहीणाबाई रघुनाथ एखंडे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्राणीशास्त्र विभागातून सर्व प्रथम

११) कै. किसन संपत पदमोर यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
श्री. चुडामण भाऊसाहेब परमोर तृतिय वर्ष संगणक शास्त्र प्रथम

१२) कै. समाजभुषण,समाजरत्न गुरुमहर्षी कोमलसिंह शंकरसिंह पाटील
कै. अण्णासाहेब जे. जी. गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-) प्रा. के. डी. राजपूत यांचे तर्फे तृतिय वर्ष कला, मुलींमधे सर्व प्रथम

१३) प्रा. डी. एल. पी. संदाशिव यांचे तर्फे (रु. ५०१/-)
तृतिय वर्ष भुगोल विभागात सर्व प्रथम

१४) कै. सौ. भगिरथी नामदेव पाटील पारितोषीक (रु. ५०१/-)
प्रा. बी. एन. पाटील यांचे तर्फे तृतिय वर्ष हिंदी विभाग सर्व प्रथम

१५) गं.भा. द्वारकाबाई नामदेव मराठे पारितोषीक (रु. २५१/-)
श्री. एकनाथ मराठे यांचे तर्फे तृतिय वर्ष कला भुगोल विषयात प्रथम.

१६) कै. वसंत सुदाम पाठक पारितोषीक (रु. ५०१/-)
प्रा. डॉ. एन. व्ही. पाठक यांचे तर्फे तृतीय वर्ष कला इंग्रजी विभागात सर्वप्रथम

१७) कै. बन्सीलाल सुकलाल जाधव यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डी. बी. जाधव यांचे तर्फे तृतीय वर्ष इंग्रजी सर्व प्रथम

१८) कै. बाबुराव सदाशिव निकम पारितोषीक (रु. ५०१/-)
प्रा. बी. बी. निकम यांचे तर्फे द्वितीय वर्ष विज्ञान मराठी 'सर्वप्रथम'

१९) कै. मजिद अझम मलक पारितोषीक (रु. ५०१/-)
प्रा. आर. एम. मलक यांचे तर्फे द्वितीय वर्ष रसायन शास्त्र विषयात सर्वप्रथम

२०) कै. सौ. प्रमिलाबाई कमलाकर कापडणे पारितोषीक (रु. ५०१/-)
'विज्ञान (वनस्पती शास्त्र) विभागात 'सर्वप्रथम'

२१) बुद्धवासी अंजनबाई देवराव वाघमारे पारितोषीक (रु. २५१/-)
श्री. आर. डी. वाघमारे यांचे तर्फे द्वितीय वर्ष वनस्पती शास्त्र 'सर्वप्रथम'

२२) कै. बन्सीलाल रावजीशेठ अहिरराव यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डॉ. पी. बी. अहिरराव यांचे तर्फे द्वितीय वर्ष पदार्थ विज्ञान सर्वप्रथम

२३) प्रा. मिलींद महाजन पारितोषीक (रु. ५०१/-)
द्वितीय वर्ष प्राणीशास्त्र या विषयात सर्वप्रथम

२४) प्रा. डॉ. सी. एम. जाधव यांचे तर्फे (रु. २५१/-)
द्वितीय वर्ष गणीत विषयात सर्वप्रथम



१५) *गणित व भौतिकशास्त्र या विषयातील प्रज्ञा विकास शिष्यवृत्ती*– उच्च माध्यमिक परीक्षेत गणित व भौतिकशास्त्र या विषयात ६०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त ५ विद्यार्थ्यांना उमवि, जळगांव तर्फे ही शिष्यवृत्ती देण्यात येते.

१६)अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती –

वरील शिष्यवृत्ती व आर्थिक सवलतीबाबतचे परिपत्र सूचना माहिती इ. वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येत असतात. विद्यार्थ्यांनी त्या सूचना व माहिती काळजीपूर्वक पहाव्यात व त्या संबंधीची चौकशी कार्यालयात संबंधीत लेखनिकांकडे केल्यास माहिती मिळू शकेल. सूचनेनुसार ठरवून दिलेल्या तारखेच्या आंत विद्यार्थ्यांनी अर्ज भरावे व योग्य त्या कागदपत्रांसह पूर्तता करणे आवश्यक आहे. पूर्ततेअभावी जर विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती अगर सवलत मिळाली नाही त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील व त्यास संपूर्ण फी भरावी लागेल. त्याबाबत कोणतीही सबब ऐकली जाणार नाही.

## महाविद्यालयाची विविध बक्षिसे

१) श्रीमान दादासाहेब रावल पारितोषीक (रु. २००१/-)
'तृतिय वर्ष महाविद्यालयात प्रथम' (विज्ञान)

२) मरहुम रियाज मोहंमद शफी पारितोषीक (रु. १५०१/-)
प्रा.डॉ. आय. आय. शेख यांचे तर्फे 'तृतिय वर्ष महाविद्यालयात द्वितीय येणाऱ्यास

३) प्रा. जे. व्ही. पाटील पारितोषीक (रु. १००१/-)
महाविद्यालयातून तृतिय येणाऱ्यास दिले जाते.

४) कै.संत शिरोमणी पुरस्कृत सरस्तीबाई कोमलसिंग पाटील यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-) प्रा. के. डी. राजपूत यांचे तर्फे विज्ञान विभागातुन सर्व प्रथम

५) कै. दिवाणसिंग बापुजी गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. के. डी. गिरासे यांचे तर्फे इलेक्ट्रॉनिक्स विभागून सर्व प्रथम

६) कै. झिपरु रामचंद्र झांबरे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डॉ. पी. झेड. झांबरे यांचे तर्फे तृतीय वर्ष पदार्थ विज्ञान विषयात सर्वप्रथम

७) प्रा. डॉ. एस. एस. राजपूत यांचे तर्फे तृतीय वर्ष रसायशास्त्र विषयात सर्वप्रथम

८) कै. नानाजी भिकेसिंग आनंदसिंग परमान यांचे स्मरणार्थ (५०१/-)
श्री. जगतसिंग परमार यांचे तर्फे तृतीवर्ष विज्ञान
रसायन शास्त्र विषयात सर्वप्रथम

९) कै. शेवंताबाई शिंपी यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)

२५) प्रा. डॉ. एल. पी. संदानशीव पारितोषीक (रु. ५०१/-)
द्वितीय वर्ष कला, भूगोल विषयात सर्वप्रथम

२६) प्रा. डॉ. डी. यू. देवरे यांचे तर्फे (रु. २५१/-)
द्वितीय वर्ष भुगोल विभागात द्वितीय

२७) कै. सोमजी पटेल यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. व्ही. एस. पटेल यांचे तर्फे द्तिीय वर्ष इंग्रजी विभागत सर्वप्रथम

२८) प्रा. एस. एन. मराठे यांचे तर्फे (रु. २५१/-)
द्वितीयवर्ष मराठी विभागत सर्व प्रथम

२९) कै. धोंडूसिंग बारीकराव गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डॉ.पी.डी. गिरासे यांचे तर्फे प्रथम वर्ष विज्ञान रसायशास्त्र विषयात सर्वप्रथम

३०) कै. झिपरु चौधरी यांचे स्मरणार्थ (रु. ३०१/-)
प्रा. डॉ. के. एस. चौधरी यांचे तर्फे प्रथम वर्ष पदार्थ विज्ञान विषयात सर्वप्रथम

३१) कै. सौ. जिसकुंवर भगवानसिंग गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डॉ. एस. बी. गिरासे यांचे तर्फे प्रथमवर्ष विज्ञान ईले. विषयात सर्वप्रथम

३२) प्रा. डॉ. सी. एम. जाधव यांचे तर्फे (रु. २५१/-)
प्रथमवर्ष विज्ञान गणित विषयात सर्वप्रथम

३३) प्रा. डॉ. जे. व्ही. पाटील यांचे तर्फे (५०१/-)
प्रथम वर्ष विज्ञान प्राणीशास्त्र विषयात सर्वप्रथम

३४) प्रा. डॉ. सतिष पाटील यांचे तर्फे (रु. ५०१/-) भुगोल विषयात सर्वप्रथम

३५) कै. गोकुळ रामा मगरे यांचे स्मरणार्थ (५०१/-)
प्रा. पी. जी माळी यांचे तर्फे प्रथम वर्ष कला सर्व प्रथम

३६) कै. अजय दशरथ निकवाडे यांचे स्मरणार्थ (५०१/-)
श्रीमती भारती अजय निकवाडे यांचे तर्फे प्रथमवर्ष कला सर्वप्रथम

३७) कै. जामसिंग रामभाऊ राऊळ यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
श्री. देवनाथ जामसिंग गिरासे प्रथम वर्ष कला, तृतीय क्रमांक

३८) कै. जतनबाई पदमसिंग गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
श्री. गजेंद्र भाऊसाहेब गिरासे एम.एस्सी. सर्व प्रथम

३९) कै. जतनबाई पदमसिंग गिरासे यांचे स्मरणार्थ (रु. ५०१/-)
प्रा. डॉ. पी. एस. गिरासे एन.एस.एस. मधील उत्कृष्ठ विद्यार्थी

या व्यतिरिक्त प्रथम, द्वितीय व तृतीय वर्ष कला व विज्ञान शाखेतून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास महाविद्यालय



तर्फे प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह देवून गौरविण्यात येते.

जिमखाना विभागात विविध खेळ प्रकारात विजेता, उपविजेता व विभाग, विद्यापीठ, आंतरविद्यापीठ, अश्वमेघ, इ. स्तरावर निवड झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह देऊन गौरविण्यात येते.

महाविद्यालयात होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये व सांस्कृतीक कार्यक्रमांमध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते.

## विद्यार्थी कल्याण कार्यक्रम

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी प्राप्त करुन देण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवित असते.

१) **राष्ट्रीय सेवा योजना** (National Service Scheme) :-
महाविद्यालयात ही योजना २० वर्षांपासून यशस्वीपणे राबविली जात आहे. या योजनेत १५० विद्यार्थी, विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात येतो. दरवर्षी जवळपासच्या खेडेगावात ०७ दिवसांचे श्रमसंस्कार शिबीर आयोजित केले जाते. प्रशिक्षित अनुभवी कुशल प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली ही योजना यशस्वी वाटचाल करीत आहे. सामाजीक बांधीलकी, नेतृत्व, श्रमप्रतिष्ठा इ. गुणांचा विकास विद्यार्थ्यात होतो.

२) **राष्ट्रीय छात्र सेना** (National Cadet Corps) :-
महाविद्यालयात ही योजना शैक्षणीक वर्ष २००८-२००९ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेत ४० विद्यार्थी व १४ विद्यार्थीनींना प्रवेश देण्यात येतो. या योजनेअंतर्गत 'B' व 'C' सर्टिफिकेट परिक्षा घेण्यात येतात. तसेच वर्षभर राष्ट्रीय स्तरापर्यन्तचे विविध शिबीरे आयोजित करण्यात येतात. त्यात विद्यार्थ्यांना सहभागी होण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, अनुशासन, शरीर संवर्धन, नेतृत्व, नेमबाजी इत्यादी गुणांचा विकास करण्याची संधी उपलब्ध करुन दिली जाते.

३) **शारीरिक शिक्षण व खेळ** :-
महाविद्यालयात शारीरिक शिक्षण व खेळ या बाबतीत विशेष दक्षता घेतली जाते. महाविद्यालयाची विविध स्तरांवर होत असलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये यशस्वी होण्याचीच परंपरा आहे. विविध देशी-विदेशी खेळ तज्ञ, अनुभवी मार्गदर्शक प्राध्यापकांच्या देखरेखीखाली विद्यार्थी खेळतात. विविध स्पर्धांमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे बक्षीसे देऊन प्रोत्साहीत करण्यात येते.

**४) ग्रंथालय :-**

महाविद्यालयाचे ग्रंथालयात विविध विषयांचे महत्वाचे ग्रंथ, पाठ्यपुस्तक, संदर्भ ग्रंथ, पर्यावरण व सामान्यज्ञान इ. क्रमीक पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथालयाच्या अभ्यासीकेत विद्यार्थी अभ्यास करु शकतात. तसेच विद्यार्थ्यांना क्रमीक पुस्तके घरी वाचण्यासाठी हवी असल्यास ती त्यांना देण्यात येतात. या व्यतिरिक्त विविध मासिके, दैनिके, रोजगार संधी यासारखे साहित्य उपलब्ध असते. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी पुस्तकपेढी योजना राबविली जाते.

**५) कला सांस्कृतिक मंडळ :-**

विद्यार्थ्यात असलेल्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी हे मंडळ कार्य करीत असते. विविध स्पर्धात्मक कार्यक्रमात विद्यार्थ्यांना भाग घेता येतो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. जास्तीत जास्त स्पर्धा कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी भाग घेण्यास मंडळ विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत असते.

**६) रेमीडियल कोचिंग क्लासेस :-**

इंग्रजी, पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र व गणित विषयात मागे पडणारे विद्यार्थी किंवा नापास झालेल्या विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे तज्ञ प्राध्यापकांकडून मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. मागासवर्गीय, अनुसुचित जाती-जमाती व अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाते.

**७) प्रवेश परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-**

पदवी शिक्षणानंतर पद्व्यूत्तर शिक्षण व विविध स्पर्धा परीक्षा संदर्भात तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. मागासवर्गीय, अल्पसंख्यांक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाते.

**८) समानता संधी केंद्र :-**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमधे समानता हा गुण रुजविण्यासाठी विविध उपक्रम घेण्यात येतात. स्त्री-पुरुष समानता, जातीय सलोखा असे विविध उपक्रम राबविले जातात.

**९) विद्यार्थी समुपदेशन केंद्र :-**

पद्व्यूत्तर शिक्षणातील उज्वल अभ्यास निवडीसाठी व नोकरी विषयक विद्यार्थ्यांचे समुपदेशनद्वारे मार्गदर्शन करण्यात येते. उज्वल भविष्य घडविण्याचा प्रयत्न या केंद्राद्वारे केला जातो. मागास वर्गीय व इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात येते.



**१०) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :-**

विविध स्पर्धा परीक्षा संदर्भात तज्ज्ञ व्यक्तींकडून मार्गदर्शन केले जाते.

**११) वादविवाद मंडळ :-**

या मंडळामार्फत महाविद्यालयात विविध विषयांवर वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा अयोजित करण्यात येतात. तसेच बाहेरील स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते.

**१२) सहल :-**

महाविद्यालयातील विविध विभागांमार्फत अभ्यासक्रमांतर्गत उपक्रम या दृष्टीने सहली आयोजित करण्यात येतात. विविध प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यात येतात. सहली प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केल्या जातात.

**१३) विद्यार्थी परिषद :-**

विद्यापीठाच्या नियमाप्रमाणे महाविद्यालयाच्या विद्यापीठ प्रतिनीधीची निवड केली जाते व त्या परिपत्रकाच्या आधारे महाविद्यालयाची विद्यार्थी परिषद गठीत करण्यात येते.

**१४) युवती सभा :-**

महाविद्यालयीन विद्यार्थीनींचे विविध प्रश्न, समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टीने या मंडळातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येतात. सामाजिक कार्यकर्ते व इतर क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती यांची व्याख्याने आयोजित करण्यात येतात.

**१५) भित्ती पत्रक :-**

विद्यार्थ्यात असलेल्या लेखनविषयक कला गुणांना वृध्दींगत करण्यासाठी महाविद्यालयात मार्गदर्शक प्राध्यापकांकडून हा उपक्रम राबविण्यात येतो. बहुसंख्य विद्यार्थी यात सहभागी होतात.

**१६) विद्यार्थी तक्रार निवारण मंच :-**

याद्वारे विद्यार्थ्यांना असलेल्या अडीअडचणींचे निराकरण विना विलंबाने करण्यात येते.

**१७) M.K.C.L. / e-Suvidha :-**

विद्यार्थ्यांना e-Suvidha उपलब्ध करुन देण्यासाठी विद्यापिठाने M.K.C.L. सोबत सांमजस्य करार केलेला आहे. या करारात M.K.C.L.ने Digital University Portal विकसीत केले आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कालखंडामध्ये आवश्यक

नियमानुसार  कारवाई करण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.  यासाठी महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही.

(१६)

## ✻ विद्यार्थ्यांच्या वर्तनासंबंधी नियम ✻

१) महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यास ओळखपत्र दिले जाईल. सदर ओळखपत्रावर विद्यार्थ्याने आपला फोटो (सध्याचा) डकवून त्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी घ्यावी. महाविद्यालय परिसरात प्रवेश करते वेळी ओळखपत्र विद्यार्थ्या जवळ असलेच पाहिजे. मागितल्यास तपासणीसाठी द्यावे. ओळखपत्राशिवाय परीक्षेचा निकाल, बोनाफाईड सर्टीफीकेट, एस.टी. पास दिले जाणार नाही, तसेच  परीक्षेस बसू दिले जाणार नाही.

२) महाविद्यालय सुरु असेल अशा प्रत्येक दिवशी विद्यार्थ्यांनी तासिका,प्रात्यक्षिकांना हजर असणे आवश्यक आहे.

३) महाविद्यालयाच्या सुत्रबद्ध शासन व्यवस्थेत व शिस्तीत कोणाही विद्यार्थ्याने महाविद्यालयात किंवा महाविद्यालयाबाहेर हस्तक्षेप करु नये. तसेच प्राचार्यांच्या पूर्व परवानगी शिवाय कोणताही कार्यक्रम महाविद्यालयात आयोजीत करु नये.

४) विद्यार्थ्यास सरकारविरोधी चळवळीत भाग घेता येणार नाही.

५) महाविद्यालयाच्या स्थावर मिळकतीची विद्यार्थ्यांनी योग्य जोपासना करावी.

६) सर्व प्रकारच्या सूचना नोटीस बोर्डवर लावण्यात येतात. विद्यार्थ्यांनी सूचना नियमीतपणे व काळजीपुर्वक वाचाव्यात. सूचना न वाचल्यामुळे होणाऱ्या परीणामास विद्यार्थी जबाबदार राहील.

७) जे विद्यार्थी दुसऱ्या गावाहून ये-जा करतात व ज्यांना एस्.टी. बस सवलत हवी असेल अशांनी आपल्या गावचा पत्ता प्रवेश अर्जावर लिहावा त्याशिवाय पास मिळणार नाही.

८) विद्यार्थी/विद्यार्थीनींचा पोषाख नीटनेटका, पूर्ण व शिस्तमान्य असावा.

९) महाविद्यालयाच्या आवारात धुम्रपान, तंबाखू, गुटखा, मादक पदार्थ-पेय इ. सेवनास बंदी आहे. मुंबई पोलिस अधिनियमान्वये शिक्षा व दंड होऊ शकतो.

१०) महाविद्यालयाचे आवारात विद्यार्थ्याने नीटनेटके राहून स्वच्छता राखावी.

(१५)

असणारे रोजगार विषयक, स्पर्धात्मक परिक्षा विषयक मार्गदर्शन, कमवा व शिका योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या रोजगाराच्या संधी, विविध अभ्यासक्रमांची माहिती, विविध उच्च शिक्षणाच्या संधी, विविध योजनेअंतर्गत उपलब्ध असलेल्या शिष्यवृत्त्या व पारितोषीकांबद्दलची माहिती विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी M.K.C.L. ने EASY (Employment Assistance Service to Youth)  हे Module विकसीत केले असून या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना वरील बाबींची अद्ययावत माहिती अत्यंत सुलभतेने, कमी वेळेत, कमी खर्चामध्ये प्राप्त करणे शक्य होणार आहे. या करीता विद्यार्थ्यांनी D.U. Portal http://nmuj.digitaluniversity.ac या संकेत स्थळावरील EASY Module ला Click केल्यानंतर दुरध्वनी क्र. 0257-2258418 PRN च्या सहाय्याने log in करुन, या Module वर उपलब्ध असलेल्या सुविधांचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. (Use 16 Digit PRN as user name and pass word) या संदर्भातील सविस्तर कार्यपद्धती D. U. Portal च्या News / Events या Link वर उपलब्ध आहे.

१८) महाविद्यालय स्नेहसंम्मेलन फी आकारत नसल्यामुळे, स्नेहसंम्मेलनाचा कार्यक्रम घेतला जाणार नाही.

## परीक्षा संबंधी

१) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नियमानुसार प्रथम वर्ष कला व विज्ञान आणि द्वितीय व तृतीय वर्ष विज्ञान या वर्गांसाठी प्रत्येक सहामाही अखेर द्वितीय व तृतीय वर्ष कला या वर्गासाठी वर्ष अखेर अंतर्गत गुणांसाठ महाविद्यालयाकडून  लेखी परीक्षा घेतली जाते.

२) वरील परिक्षा विद्यार्थ्यास सक्तीच्या आहेत.

३) महाविद्यालयातील उपस्थिती ८० टक्के व सत्रांत परीक्षांची उपस्थिती याबाबी परीक्षा फॉर्म भरतांना लक्षात घेण्यात येतात. उपस्थिती कमी असल्यास परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.

४) प्रवेश अर्जात जे विषय घेतले असतील त्याच विषयांची परिक्षा देता येईल.

५) विद्यार्थ्यांनी नेमून दिलेल्या मुदतीत परीक्षा अर्ज व फी भरणे आवश्यक आहे.

६) विद्यापीठ परीक्षांसाठी सत्र मंजूर असणे आवश्यक आहे.

७) अंतर्गत व बहि:स्थ परीक्षेमध्ये गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठ

११) महाविद्यालयात होणाऱ्या विविध कार्यक्रमात विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आहे.

१२) एखाद्या विद्यार्थ्याचे वर्तन महाविद्यालयाच्या हिताच्या दृष्टीने अपायकारक आहे. असे प्राचार्यांचे मत झाल्यास त्या विद्यार्थ्याचा प्रवेश त्वरीत रद्द करण्यात येईल.

१३) महाविद्यालय परिसरात रॅगिंग सारखा गंभीर व अमानवी प्रकार केल्यास संबंधीत विद्यार्थ्यावर विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल.

१४) महाविद्यालयात विद्यार्थी किंवा पालकांनी किंवा विद्यार्थ्यांचे मित्र किंवा नातेवाईकांनी दारु किंवा तत्सम मादक पदार्थ सेवन करुन येऊ नये, तसे केल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल व त्यास स्वत: विद्यार्थी जबाबदार राहील.

१५) विद्यार्थ्याने महाविद्यालयात येतांना कोणत्याही प्रकारचे शस्त्र किंवा धारदार वस्तू ज्याने मनुष्यास इजा होईल असे आणू नये. तसे केल्यास संबंधीत विद्यार्थ्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन त्वरीत प्रवेश रद्द केला जाईल.

## सत्र मंजूर होण्याचे नियम

१) विद्यार्थ्यांची प्रत्येक सत्रातील प्रत्येक विषयाची हजेरी कमीत कमी ८०% असली पाहिजे.

२) प्रत्येक सत्रांत परीक्षांना विद्यार्थ्यांने बसणे सक्तीचे आहे.

३) संबंधीत विद्यार्थ्याची प्रगती व निकाल समाधानकारक नसेल / हजेरी कमी असेल तर परीक्षा फॉर्म भरता येणार नाही / परीक्षा फॉर्म परत बोलावला जाईल व होणाऱ्या शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

## स्वोध्दारक विद्यार्थी संस्थेच्या अन्य शैक्षणिक शाखा

१) दादासाहेब रावल महाविद्यालय, दोंडाईचा.

२) राऊळ दौलतसिंहजी बहुउद्देशिय माध्यमिक व उच्च माध्यमिक, किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम, दोंडाईचा.

४) दादासाहेब रावल माध्यमिक व उच्च माध्यमिक दोंडाईचा.

५) गर्ल्स हायस्कूल, माध्यमिक व उच्च माध्यमिक व किमान कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम, दोंडाईचा.



६) अ. म. बागुल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मालपूर.

७) बाम्हणे हायस्कूल, बाम्हणे.

८) राणीमाय बहीणसाहेब राऊळ माध्यमिक विद्यालय, बह्याणे, ता जि. नंदुरबार

९) झिरवे-धावडे माध्यमिक विद्यालय, झिरवे.

१०) दादासाहेब रावल खाजगी प्राथमिक शाळा, दोंडाईचा.

११) सावित्रीबाई फुले कन्या प्राथमिक शाळा, दोंडाईचा.

१३) साने गुरुजी प्राथमिक शाळा, मालपूर.

१४) शिरीषकुमार बालमंदीर, मालपूर.

१३) औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दोंडाईचा.

१४) उदय छात्रालय, दोंडाईचा.

१५) उत्कर्ष छात्रालय, मालपूर

१६) देगांव हायस्कूल, देगांव

१७) राणी माँसाहेब मनुबादेवी रावल नर्सिंग स्कूल, दोंडाईचा.

१८) राणी माँसाहेब महिला विज्ञान महाविद्यालय, दोंडाईचा.

१९) श्री. जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्नीक कॉलेज

२०) श्रीमंत राजे दौलतसिंहजी रावल अध्यापक विद्यालय, दोंडाईचा

२१) श्रीमंत राजे दौलतसिंहजी रावल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, दोंडाईचा

२२) श्री. जयकुमार रावल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंजिनिअरींग कॉलेज

२३) विकासरत्न मा. सरकारसाहेब रावल कृषि महाविद्यालय, दोंडाईचा.

## केंद्र शासनाचा माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| अपिलीय अधिकारी | – | प्रभारी प्राचार्य एस.एस. राजपूत |
| माहिती अधिकारी | – | श्री. जी. पी. राजपूत |
| सहाय्यक माहिती अधिकारी | – | श्री. एम्. एम्. गिरासे |

## S. V. S's. ARTS & SCIENCE COLLEGE,
## DONDAICHA, DIST. DHULE
### Particulars of Class-wise fees for the year 2018-2019

| Sr. No. | Name of the Fee | F.Y. B.A. | S.Y. B.A. | T.Y. B.A. | F.Y. B.Sc. | S.Y. B.Sc. | T.Y. B.Sc. | M.Sc. I | M.Sc. II |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Admission Fee | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 2 | Library Fee | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 125 | 300 | 300 |
| 3 | Medical Fee | 25 | - | - | 25 | - | - | 25 | - |
| 4 | Gymkhana Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 |
| 5 | Tutorial & Internal Exam | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 60 | 100 | 100 |
| 6 | Disaster Management Fee | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 7 | Magazine Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| 8 | Laboratory Fee | - | * | * | 600 | 700 | 800 | 5000 | 5000 |
| 9 | College Development Fund | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 75 | 90 | 90 |
| 10 | Student Activity Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 50 | 50 |
| 11 | Poor Student Aid Fee | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 100 | 100 |
| 12 | Ashwamedh Fee | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 | 30 |
| 13 | Computerization Fee | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 14 | Student Group Insurance | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 |
| 15 | E-Suvidha Fee | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 | 50 |
| 16 | Identity Card | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 | 20 |
| 17 | Alumni Association Fee | - | - | 25 | - | - | 25 | - | 25 |
| 18 | Pesonality Development | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 | 25 |
| 19 | Misceleneous Fee | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 100 | 150 | 150 |
| 20 | Environment Science Fee | 100 | - | - | 100 | - | - | - | - |
| 21 | Eligibility Fee | 50 | - | - | 50 | - | - | 60 | - |
| 22 | General Knowledge Fee | 50 | 50 | - | 50 | 50 | - | - | - |
| 23 | Practical Exam. Fee | - | - | - | - | - | - | - | - |
| 24 | Student Welfare Fee | 25 | 25 | 25 | 25 | '25 | 25 | 25 | 25 |
| 25 | Tution fee | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 12000 | 12000 |
| 26 | Registration Fee | - | - | - | - | - | - | 75 | 75 |
| 27 | Library Deposit | - | - | - | - | - | - | - | - |
| 28 | Laboratory Deposit | - | - | - | - | - | - | - | - |
| Toal Fee for Paying Students Rs. | | 1830 | 1645 | 1620 | 2430 | 2345 | 2420 | 18305 | 18245 |
| Total Fee for EBC Students Rs. | | 1030 | 845 | 820 | 1630 | 1545 | 1620 | - | - |

*** - Laboratory fee for Geography Special Rs.250/- for S.Y. &T.Y.B.A.Class.**

टिप : महाराष्ट्र शासन व उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांच्या धोरणानुसार वेळोवेळी 'फी' मध्ये होणारे फेरफार विद्यार्थ्यांना बंधनकारक असतील.'' उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीपत्रकान्वये विविध शुक्रांची पुर्नरचना चालु असून उ.म.वि. आदेशान्वये सुधारीत शुक्ररचना शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून लागू करण्यात येणार आहे. व त्यानुसार होणारा बदल विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

★ जे विद्यार्थी S.Y./T.Y. B.A. वर्गात भुगोल स्पेशल विषय घेतील, त्यांना रु. २५०/- प्रत्यक्षीक फी जादा भरावी लागेल.